# गिरगाव प्रकल्प बाधितांच्या इमारतीच्या निविदांना १० कंपन्यांचा प्रतिसाद

**मुंबई** ● मुंबई मेट्रोरेल कॉर्पोरेशद्वारे (एमएमआरसी)गिरगाव येथील प्रकल्पबाधितांसाठी इमारत बांधण्यात येत असून त्यासाठी मागविण्यात आलेल्या पूर्वअर्हता निविदेला बांधकाम क्षेत्रातीलकंपन्यांचा भरघोस प्रतिसाद लाभला. एकूण दहा कंपन्या या प्रक्रियेत सहभागी झाल्या होत्या.गिरगाव येथे बांधण्यात येणार असलेल्या या इमारतीमध्ये कुलाबा वांद्रे सिप्झ मेट्रो-३ प्रकल्पामुळे बाधित झालेले रहीवासी, व्यावसायिक व कार्यालयांचे पुनर्वसन केले जाणार आहे.

पूर्वअर्हता अर्जदाखल केलेल्या कंपन्यांमध्ये जेएमसीप्रोजेक्ट(इंडिया), टाटा प्रोजेक्टस लिमिटेड, एल अँड टी लिमिटेड,वास्कॉन इंजिनिरिंग लिमिटेड, शपूरजी पालनजी अँड कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, मोंटोकारलो लिमिटेड, कॅपसाइट इन्फ्रा प्रोजेक्ट लिमिटेड, न्याती इंजिनिअर्स अँड कन्सल्टंट प्रायव्हेट लिमिटेड, मॅन इन्फ्रा कन्स्ट्रक्शन लिमिटेड व नाथानी पारेख कन्स्ट्रक्शन लिमिटेड आदींचा समावेश आहे. कॉर्पोरेशनद्वारे लवकरात लवकर पूर्व अर्हता प्रक्रिया पूर्ण करून केली जाणार आहे. या प्रक्रियेमार्फत निवडलेल्या कंपन्याद्वारे निविदा मागविण्यात येतील.गिरगाव पुनर्विकास इमारतीमध्ये ४७३ रहिवासी सदनिका,१३७ व्यावसायिक आस्थापना व १९व्यावसायिक कार्यालयाचा समावेश राहील.

या ४८ मजली इमारतीचे तीन तळमजले सेवा तसेच पार्किंगसाठी राखीव असतील व ग्राउंड लेव्हल, एक ते सात मजले अंशतःव्यावसायिक गाळे व सेवादेण्यासाठी राखीव असतील. आठ ते नऊ मजले व्यावसायिक गाळे,सेवा तसेच सुविधांसाठी राखीव असतील. १० ते १८मजल्यांवरव यावसायिक गाळे तसेच सदनिका असतील व १९ते ४८मजल्यांवर रहिवासी सदनिका असतील.या इमारतीस कारपार्किंगची सुविधा तसेच बगीचा आदी सुविधा राहतील. एकूण ४८मजल्यांपैकी ३९मजले रहिवासी सदनिकांसाठी राखीव असतील.

काळबादेवी गिरगाव पुनर्वसन आराखड्याअंतर्गत ६ वेगवेगळ्या भूखंडांचे एकत्रितरित्या विकास केल्या जाणार आहेत. एकूण ६भूखंडांपैकी के२, के३,जी३ हे भूखंड एकात्मिकरित्या विकसित केले जातील तर के१,जी१व जी२ भूखंड मेट्रोसंबंधी कामांसाठी वापरण्यात येणार आहेत. एमएमआरसी मार्फत के३ ही इमारत बांधण्यासाठी वास्कॉन या कंपनीची आधीच निवड झाली असून या इमारतीचे बांधकाम लवकरच सुरू होणार आहे.